८०६

"२० प्रत" संदर्भ (१)

(२) pages

(१)

पाटबंधारे प्रकल्पांतर्गतची बांधकामे
दगडी बांधकामा ऐवजी संधानकात
(काँक्रीट मध्ये) करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
पाटबंधारे विभाग,
परिपत्रक क्रमांक संकीर्ण /१०१/२००१/(५७१/२००१)/मीप्र-२
दि. ९/७/२००२

संदर्भ:- १) शासन परिपत्रक क्र.एमआयएस १०९३/(३६५/९३)/मीप्र (प्र), दि.४ ऑक्टोबर १९९३.
२) शासन पत्र क्र.संकीर्ण १०९३/(३६५/९३)/मीप्र (प्र), दि.२.१.९५

**प्रास्तविक -**

दगडी बांधकामाची गुणवत्ता योग्य प्रतीची राखली जात नसल्याचे शासनाच्या वेळोवेळी निदर्शनास आलेले आहे, तसेच आणलेही गेलेले आहे. या दृष्टीकोनातून चांगल्या गुणवत्तेची बांधकामे होण्यासाठी योग्य त्या उपाययोजनांचा अवलंब देखील वेळोवेळी करण्यात आलेला आहे. या संदर्भात वरील परिपत्रकांद्वारे कालव्यावरील बांधकामातील प्रस्तंभ व अंत्यस्तंभ संधानकात करण्या संदर्भातील आदेश आगोदरच निर्गमित करण्यात आलेले आहेत. आता पाटबंधारे प्रकल्पांतर्गत दगडी बांधकामाऐवजी संधानकात बांधकामे करणे अनिवार्य करण्याचा प्रश्न काही काळ शासनाचे विचाराधीन होता. या विषयानुषंगाने धुळे येथे झालेल्या मुख्य अभियंता परिषदेत चर्चा झालेली आहे व सर्वच मुख्य अभियंता यांनी यापुढे दगडी बांधकामाऐवजी संधानकाचा वापर करण्याबद्दल आग्रहाने मते मांडली व तशी शिफारस केली होती. अनुसरुन खालील आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**आदेश :-**

१.० पाटबंधारे प्रकल्पांतर्गत येथून पुढील कालावधीत कालव्यावरील सर्व बांधकामे संधानकात करणे अनिवार्य करणेत येत आहे. त्याचवेळी बांधकामे खर्चिक होणार नाहीत यासाठी बांधकामाच्या गरजेनुसार योग्य त्या प्रतीचे(grade) संधानक वापरले जाईल हे पहाण्याची जबाबदारी क्षेत्रीय अधिकाऱ्यांची राहील.

२.० शक्य असेल तेथे यांत्रिकी पध्दतीचा वापर करुन उत्तम संधानक तयार करणे व ते योग्य प्रकारे वापरणे याबाबत दक्षता घेऊन बांधकामाची गुणवत्ता वाढविणे आवश्यक राहील. कोणतेही संधानकातील काम मिक्सर व व्हायब्रेटरच्या वापराशिवाय केले जाणार नाही याची काळजी घ्यावी. भक्कम व उत्तम फार्म वर्क ही संधानकांच्या कामांची आवश्यकता राहील. आर.सी.सी. कामात पुरेसे कव्हर दिले जात आहे याचीदेखील खातरजमा करावी.उत्तम संधानक निर्माण करण्याची व त्याच्या प्लेसमेंटची चांगली व्यवस्था या बाबी पण आवश्यक राहतील.

H-440 (1000-07-02) 1

[कृ.मा.प.:-

दगडी धरणाच्या बाबतीत मात्र जेथे कमी अंतरावर उत्तम गुणवत्तेची नैसर्गिक वाळू उपलब्ध आहे, बांधकामाचे परिमाण कमी आहे व इतर बाबी पूरक आहेत, तेथे कोल ग्राऊट मेसनरीचा पर्याय खुला राहील. मात्र धरणाचे कोणतेही काम दगडी बांधकामात करु नये.

३.० या आदेशानुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, ज्या निविदेअंतर्गतची कामे प्रगतीपथावर आहेत या निविदा मंजूर होऊन कार्यारंभ आदेश देणे अपेक्षित आहे अशा ठिकाणी मात्र बांधकाम प्रकारात कसलाही बदल करण्यात येऊ नये.

४.० या परिपत्रकातील सूचना सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी न चुकता नजरेस आणण्यात याव्यात.

५.० उपरोक्त सूचना पाटबंधारे विभागांतर्गत सर्व महामंडळांसाठी लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( दि.मा. मोरे )
मुख्य अभियंता व सह सचिव

प्रत-

सर्व कार्यकारी संचालक, महामंडळे
सर्व मुख्य अभियंता,
सर्व अधीक्षक अभियंता,
सर्व कार्यकारी अभियंता
सर्व तांत्रिक कार्यासने, पाटबंधारे विभाग, मंत्रालय
सर्व तांत्रिकी अधिकारी, पाटबंधारे विभाग, मंत्रालय

—x—x—x—

H-440-(1000-07-02) 1a.

जा.क्र.म.सं.सं./द.वि.२/२८९/२००४

अधीक्षक अभियंता (दरवाजे)
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना
दिंडोरी रोड, नाशिक-४.
दिनांक -२८/१०/२००४

प्रति,

मा.मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, अमरावती.
मा.मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, आकाशवाणी केंद्राशेजारी, जालनारोड,औरंगाबाद.
मा.मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, औरंगाबाद(गजानन महाराजमंदिराजवळ)
मा.मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, पाटबंधारे विभाग, नाशिक.
मा.मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, कोकण प्रदेश, हॉंगकॉंग बॅंक बिल्डींग, ४ था मजला, हुतात्मा चौक, मुंबई.
मा.मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, कोयना प्रकल्प, सिंचनभवन,बारणेरोड,पुणे-११.
मा.मुख्य अभियंता, (पाटबंधारे ) सिंचनभवन,बारणेरोड,पुणे-११.
मा.मुख्य.अभियंता, (विनिर्दिष्ट प्रकल्प ) पाटबंधारे विभाग, सिंचनभवन,बारणेरोड,पुणे-११.
मा.मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
मा.मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प,सिंचन सेवाभवन,सिव्हील लाईन्स, नागपूर.
मा.मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग,सिंचन सेवाभवन,सिव्हील लाईन्स, नागपूर-१

**विषय** :- पाटबंधारे प्रकल्पांतर्गतची बांधकामे दगडी बांधकामा ऐवजी संधानकात (कॉंक्रीट मध्ये) करण्या बाबत.

**संदर्भ** :- १) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/१०१/२००१/(५७१/२००१)मो.प्र.-२ दि.९-७-२००२
२) महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.संकीर्ण/२००४/१३५७/१९७/२००४/मो.प्र.-२ दि.६-७-२००४

२३९५
दिनांक २८/१०/०४

उपरोक्त संदर्भ क्र.१ शासन परिपत्रकान्वये पाटबंधारे प्रकल्पांमर्गची बांधकामे दगडी बांधकामा ऐवजी संधानकात (कॉंक्रीट मध्ये) किंवा कोलग्राऊट मेसॉनरी (Colgrout Masonary)मध्ये करण्याच्या सूचना आहेत. उपरोक्त कामामध्ये धरण विमोचकांच्या कामांबाबत उल्लेख दिसून येत नव्हता. याबाबत शासनाकडे संदर्भ केला असता संदर्भ क्र.२ अन्वये धरण विमोचकांच्या संदर्भातचे पायातले बांधकाम हे धरणाच्या कामात अंतर्भूत असल्याने शासन परिपत्रकातील (संदर्भ क्र-१) बाब क्र.२ मधील प्ररिच्छेद क्र.२ मध्ये दिलेले निर्देश हे सिंचन आणि सिंचन तथा विघुत विमोचकातीन जी कामे दगडी बांधकामात करण्यात येतात, या कामांना लागू आहेत, असे शासनाने कळविले आहे.

( अ.मा.अंबाडेकर )
अधीक्षक अभियंता (दरवाजे)
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना
नाशिक-४.

**सोबत** - वरील प्रमाणे

प्रत - अधीक्षक अभियंता, (मा.ध./ द.ध./ दरवाजे/ वि.गृ./ धरण सुरक्षा ), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक-४ यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.

प्रत, कार्यकारी अभियंता, संकल्पचित्र विभाग क्र. १ मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांना माहितीसाठी अग्रेषित.

C:\Admn\Const-concrete.doc